**हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**दिनांक 25/12/2017**

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गद"ानाखाली हिंगोली जिल्हयात दि 24/10/2017 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (24) वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 4800/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गद"ानाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्याविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टे"ान अंतर्गत वि"ोष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक 25/12/2017 रोजी जुगार कायदया अंतर्गत पो.स्टे.हिंगोली शहर प्रापर येथे (01) ठिकाणी छापा मारून आरोपी 1 शे शारेक शे सत्तार 2.शे सलीम शेरहीम 3. किरण रघुनाथ जाधव 4. अरबाज सर्व रा मस्तानशहानगर हिंगोली 5 शे समीर शेरहीम रा तलाबकटटा हिंगोली यांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडून जुगाराचे साहीत्य 1 मोबाईल व नगदी असा एकुण 1600 रु. मुददेमाल जप्त करण्यात आला असुन, आरोपीतां विरूध्द जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत

**चोरी**

दिनांक 24/12/2017 रोजी फिर्यादी देविरंग देवबा सातव रा मसोड यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 21/12/2017 रोजीचे 21.00 ते दि. 22/12/2017 रोजीचे सकाळी 08.00 वा चे सु फिर्यादीचे मसोड आरोपीने मौजे मसोड षिवारातील फिर्यादीचे शेत गट क्रं 113 मध्ये बोअरमध्ये असलेली पाण्याची मोटार,पाण्याचा पाईप व लाईनचा केबल जुना वापरता किं 20,000 रू चा माल चोरून नेला या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करीत आहेत

**दुखापत** :- दिनांक 24/12/2017 रोजी फिर्यादी प्रविन रामकृष्ण मते रा तपोवन यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे कलम 324,323,504,506,34 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 24/12/2017 चे 19.30 वा तपोवन येथे फिर्यादीचे राहते घरासमोर आरोपीतांनी संगणमत करून आरोपी क्रं 01 याने स्वप्नील यास म्हणाला की रस्ता काय तुझ्या बापाचा आहे का या कारणावरून हातातील चाकून समोरून बेंबीजवळ मारल्याने रक्त निघाले व आरोपी क्रं 02 यांनी त्याचे हातातील चाकून फिर्यादीस डावे हाताचे बोटावर मारले व साक्षीदार हा भांडण सोडविण्याकरीत आला असता आरोपी क्रं 03 याने त्याचे हातातील काठीने डोक्यात हातावर मुक्का मार दिला व आरोपी क्रं 04 याने पण मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करीत आहेत

**दंगा** :- दिनांक 25/12/2017 रोजी फिर्यादी सजनबाई नामदेव मते रा तपोवन यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे कलम 143,323,504,506 प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 24/12/2017 रोजी मौजे तपोवन येथे आरोपीचे राहाते घरासमोर आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन बॅट-या का दाबता असे विचारल्याचे कारणावरून मला व माझे पतीला शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून व मुक्का मार देवुन जिवे मारण्याची धमकी दिली या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करीत आहेत

**जबरीचोरी** :- दिनांक 24/12/2017 रोजी फिर्यादी शे मैनोदीन शेख रब्बानी रा मंगळवारा छीला मज्जीद जवळ हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम 392 प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 24/12/2017 चे 11.15 वा बस स्थानक हिंगोली फिर्यादी हा नांदेड येथे जाण्यासाठी अमरावती ते नांदेड बस मध्ये चटन असतांना यातील आरोपीतांनी फिर्यादीचे खिषातील पैसे काढत असतांना फिर्यादीने त्याचा हात धरला असता आरोपीने फिर्यादी सोबत झटापटी करून मारहान करून फिर्यादीचे खिषातील 10,000 रू पैकी 6,500 रू जबरीने चोरून पळून गेला या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत

पोलीस अधिक्षक हिंगोली

करीता